# सुखकर्ता दुखहर्ता

Sukhkarta Dukhharta — Ganpati Aarti · Samarth Ramdas Swami

सुखकर्ता दुखहर्ता न वार्ता विघ्नाची ।
नुरवी पुरवी प्रेम कृपा जयाची ।
सर्वांगी सुंदर उटी शेंदुराची ।
कंठी झळके माळ मुक्ताफळांची ॥०१॥

> जय देव जय देव जय मंगलमूर्ती, हो श्री मंगलमूर्ती ।
> दर्शनमात्रे मन, स्मरणे मात्रे मन, कामनापुर्ती, जय देव जय देव ।

रत्नखचित फरा तूज गौरीकुमरा ।
चंदनाची उटी कुंकुमकेशरा ।
हिरे जडित मुकुट शोभतो बरा ।
रुणझुणती नुपुरे चरणी घागरिया ॥०२॥

लंबोदर पितांबर फणीवर बंधना ।
सरळ सोंड वक्रतुंड त्रिनयना ।
दास रामाचा वाट पाहे सदना ।
संकटी पावावे निर्वाणी रक्षावे सुरवरवंदना ॥०३॥